# श्री शांतीनाथ सेवा संस्थान, जैन तिर्थ, संगमनेर

२५७, नवरंग बाग, घुलेवाडी, संगमनेर - ४२२६०५.
मो. नं. : ९३७११०७४३९, ९५१८७८८१००, ९०२२८७५२५५


**मानव सेवा, ही ईश्वर सेवा**

## पसायदान

आतां विश्वात्मके देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।। १७९३ ।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचे ।। १७९४ ।।

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।। १७९५ ।।

वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ।। १७९६ ।।

चलां कल्पतरूंचे आरव । चेतनाचिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।। १७९७ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। १७९८ ।।

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित । १७९९ ।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।। १८०० ।।

येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। १८०१ ।।

आता यावर विश्वरुप देवाने माझ्या या वाग् यज्ञावर संतुष्ट होऊन मला हा प्रसाद द्यावा. दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो आणि सर्व जिवांची परस्परांशी मैत्री होवो या सर्व विश्वामधील पापरुपी अंधार नाहीसा होवो, स्वधर्मरुपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश सर्वत्र पसरु दे आणि प्राणिमात्रांच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या पूर्ण होवोत. या भूतलावर मांगल्याचा वर्षाव करणाऱ्या ईश्वभक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्‌भावनेने सदोदित भेट होवो ते भक्तजन कसे आहेत तर चालते बोलते कल्पतरुचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव आणि अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररुपी अंधकार दूर करुन शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवद्‌भक्त ते सकल जिवांना प्रिय होवोत. फार काय सांगावे, सर्व त्रैलोक्य सुखाने परिपूर्ण होऊन सर्वांना अखंड हरिभजन करण्याची इच्छा होवो. या जगात ज्यांचे ज्यांचे प्रेम या ग्रंथावर अढळ असेल, त्यांचे जीवनच बनून राहिले असेल. त्यांना इहलोकीचे व परलोकीच सुख प्राप्त होवो, विजय मिळो. तेव्हा सद्‌गुरु निवृत्तिनाथ प्रसन्न होऊन म्हणाले, 'तुझ्या मनासारखे होईल.' ते ऐकून ज्ञानदेव संतोषित झाले.

।। पुंडलीकरवरदा हरि विठ्ठल ।।   ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।   ।। श्री ज्ञानदेव तुकाराम ।।